रे. दि. मु. क्रमांक ८२/२०१२ मधील नि.क्र. ७२ खालील आदेश.
रविंद्र सोनवणे व इतर -विरुध्द- मोहन देडे व इतर
आदेश पारित दिनांक ०१.०३.२०२४

---

वादींतर्फे प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादी क्र. ६ शोभा विजय माने या मयत असल्याने त्यांचे नावाला कंस करून त्यापुढे मयत हा शब्द लिहिण्यास परवानगी मिळावी, याकरीता दाखल केलेला आहे. सदर अर्जासह वादी रविंद्र बाबूराव सोनवणे यांचे निशाणी क्र. ७३ वर सत्यप्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल केले आहे.

**०२.** प्रस्तूत अर्जामध्ये असे कथन करणेत आले आहे की, सदरचा दावा चालू असताना या दाव्यातील प्रतिवादी क्र. ६ शोभा विजय माने या दिनांक १५.११.२०२३ रोजी मयत झाल्या आहेत. त्याच्या पुष्ठ्यर्थ वादीने मयत प्रतिवादी क्र. ६ हिचे मृत्यू प्रमाणपत्राची छायांकित प्रत नि.क्र. ७५/१ वर अभिलेखावर दाखल केली आहे. प्रस्तूत अर्जात नमूद केलेनुसार मयत प्रतिवादी क्र. ६ शोभा माने यांना अपत्य नाहीत. तसेच मयत प्रतिवादी क्र. ६ यांना कोणीही कायदेशीर वारस नाहीत. त्यामुळे प्रतिवादी क्र. ६ शोभा माने यांच्या नावाला कंस करून त्यापुढे मयत हा शब्द लिहिणेत यावा. प्रस्तूतची दुरुस्ती ही किरकोळ स्वरुपाची असल्यामुळे दाव्याच्या सरनाम्यामध्ये कोणताही बदल होत नाही. करीता मयत प्रतिवादी क्र. ६ शोभा विजय माने यांच्या नावास कंस करून त्यापुढे मयत हा शब्द लिहिणेस परवानगी मिळावी, ही विनंती करणेत आली आहे.

०३. सदरकामी, प्रतिवादी क्र. १ चे वारस व प्रतिवादी क्र. २ तर्फे विधिज्ञांनी हे म्हणणे दाखल की, प्रस्तुत अर्जातील मजकूर खोटा व लबाडीचा आहे. प्रतिवादी क्र. ६ ही मयत असली तरी तिला कोणीही वारस नाही. पर्यायाने दावा दुरूस्तीस वेळकाढूपणा करणेची आवश्यकता नाही. तसेच वादीने सदर अर्जाची प्रत ही प्रतिवादीस दिलेली नाही. वादी केवळ प्रस्तुत दाव्याचे कामकाज प्रलंबित करत आहेत. सबब, प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा व वादीस रक्कम १,०००/- रुपये कॉस्ट करण्यात यावी, ही विनंती केली आहे आणि त्याच अनुषंगाने युक्तिवाद केला आहे.

**०४.** वादीचे प्रस्तूत अर्जाचे अवलोकन केले असता हे दिसून येते की, प्रतिवादी क्र. ६ शोभा विजय माने या दिनांक १५.११.२०२३ रोजी मयत झाल्या आहेत. प्रस्तूत अर्जात नमूद केलेनुसार मयत प्रतिवादी क्र. ६ शोभा माने यांना अपत्य नाहीत. तसेच मयत प्रतिवादी क्र. ६ यांना कोणीही कायदेशीर वारस नाहीत. सदर दाव्याचा गुणदोषावर निकाल देणेकामी प्रतिवादी क्र. ६ शोभा माने यांच्या नावाच्या पुढे 'मयत' असे लिहून त्यांच्या नावास कंस करणे न्यायोचित होईल. सबब, खालील आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | वादींचा निशाणी क्र. ७२ चा अर्ज मंजूर करणेत येतो. |
| २. | वादी यांनी त्यांच्या अर्जामध्ये नमूद केलेली दुरुस्ती विहीत कालावधीमध्ये करावी व त्याप्रमाणे दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करणेत यावी. |
| ३. | सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी. |

स्वाक्षरीत/-
(अ. क. दामटे)
दिनांकः- ०१.०३.२०२४ दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, खंडाळा.